REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2024

# ब्रिटिशांनी केलेले भारताचे आर्थिक शोषण

जिजाभाऊ तुकाराम दातीर
(संशोधक विद्यार्थी), पुणे विद्यापीठ.



आर्थिक शोषण म्हणजे काय ? आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी, प्रगतीसाठी एका व्यक्तीने, व्यक्ती समूहाने वा देशाने दुसऱ्या व्यक्तींची / व्यक्तिसमूहाची वा देशाची संपत्ती शक्य असेल त्या मार्गांनी शोषून घेण्याची प्रक्रिया म्हणजे आर्थिक शोषण होय. जसे ब्रिटिशांनी केलेले भारताचे आर्थिक शोषण. ब्रिटिशांनी भारतीयांचा आत्यंतिक छळ करून असे शोषण केले की ज्यामुळे भारतीयांना जगणेही अवघड होऊन गेले. त्यांची दैन्यावस्था ओढवली. अर्धपोटी दिवस काढून ते कसेबसे जगू लागले.

भारत असा संपन्न देश होता की ज्यावर सतत इतरांचा डोळा होता. त्यामुळे भारतावर अगदी प्राचीन काळापासून परकीयांची सतत अतिक्रमणे होत राहिली. प्राचीन काळात सिकंदरासारखे आक्रमक भारताच्या संपन्नतेच्या कथा ऐकून त्याकडे आकर्षित झाले. संपत्तीच्या कारणामुळेच मध्ययुगातही अनेक मुस्लिम रानटी टोळयांची आक्रमणे झाली. त्यातील काहींनी भारतातून प्रचंड संपत्ती लुटून नेली मात्र त्यातील काही येथेच स्थिर होऊन राज्यकर्ते बनले. भारतीय संस्कृतीचा एक भाग बनले. यानंतर भारतावर वक्र दृष्टी फिरली ती युरोपीय लोकांची भारताशी संबंध निर्माण करण्यासाठी ते धडपडू लागले. वास्को-द-गामा याने शोधलेल्या सागरी मार्गाने अनेक युरोपीय व्यापारी भारतात आले. त्यांच्या सुरुवातीच्या व्यापारी धोरणालाच पुढे राजकीय वळण लागले. असाच एक ब्रिटीश व्यापारी गट म्हणजे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी इ.स. १६०० साली स्थापन झालेल्या कंपनीने भारतीय व्यापार व त्यानंतर राजकीय क्षेत्रात यश प्राप्त केले व ती भारताची राज्यकर्ती बनली. साम, दाम, दंड, भेद या कुटनीतीचा वापर करून तिने भारतावर वर्चस्व मिळवून भारताचे शक्य होईल तितके आर्थिक शोषण केले. त्यांच्या प्रचंड आर्थिक शोषणाने संपन्न असा भारत देश आर्थिकदृष्ट्या दरिद्री बनला. यापूर्वी भारतात फक्त राजकीय सत्तांतर घडत होते. अर्थव्यवस्थेवर मात्र आघात आतापर्यंत झाला नव्हता. ब्रिटिशांनी मात्र अर्थव्यवस्थेवर आघात करून जीवनमान विस्कळीत करून टाकले.

भारतात राजकीय सत्ता निर्माण करत असताना भारतातून जास्तीत जास्त संपत्ती कशी लुटता येईल याकडे ब्रिटिशांनी जास्त लक्ष दिले. भारताची लूट हे त्यांचे मुख्य ध्येय होते. राजकीय सत्ता, न्यायव्यवस्था, महसूल पद्धती ही इतर धोरणे त्यांनी शोषणास सहाय्यक म्हणूनच राबविली. भारतात सुधारणा, विकास करून भारतास आधुनिक बनवण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. फक्त संपत्ती वाहून नेणे एवढाच त्यांचा हेतू होता व तो त्यांनी पूर्णपणे पार पडला. संपत्तीच्या शोषणाच्या दृष्टीने त्यांनी व्यापार, उद्योग, महसूल, जकाती ही धोरणे राबविली. या त्यांच्या धोरणांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर मूलगामी परिणाम झाले. ब्रिटिशांचे हे धोरण ब्रिटिशांच्या हिताला

अनुकूल आणि भारतीयांच्या हिताला प्रतिकूल असे होते. ज्यावेळी भारतीयांना या धोरणाची जाणीव होऊ लागली, त्यावेळी भारतीयांत असंतोष निर्माण होऊन ते ब्रिटीश सत्तेविरुद्ध एकत्र आले व त्यांना विरोध करण्यास सुरुवात झाली.

## स्वयंपूर्ण खेडी:

ब्रिटीशपूर्व भारत हा स्वयंपूर्ण होता. भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती. मोगल सम्राट जमीन महसूल पिकांची स्थिती, उत्पन्न पाहून घेत. दुष्काळ, पूर अशी संकटे आली तर करात सूट मिळे. ब्रिटिशांनी मात्र सारा रोख स्वरुपात घेण्यास सुरुवात केली. तो वेळच्यावेळी भरावा लागे. नैसर्गिक आपत्तीच्यावेळीही त्यात सूट मिळत नसे. ब्रिटिशांनी जमिनीची मोजणी करून सगळीकडे समान कर आकारणी केली. या त्यांच्या पद्धतीमुळे स्वयंपूर्ण खेड्यांची रचना नष्ट झाली.

ब्रिटिश ज्यावेळी भारतात आले त्यावेळी ते व्यापारी होते. त्यांना मुघल सम्राटांकडून त्यासाठी परवानगी घ्यावी लागे. ते विनंती करून काही सवलती मिळवत. सोन्या चांदीच्या बदल्यात ते भारतीय वस्तू खरेदी करत असत व पाश्चिमात्य देशांत विकून प्रचंड नफा कमवत. सुरुवातीस ब्रिटिश हे याचक होते. "भारताबरोबरचा त्यांचा व्यापार म्हणजे एक प्रकारची शर्यतच होती ती म्हणजे भारताला मान्य होईल अशा वस्तू मिळवणे, त्यासाठी वेस्ट इंडीज आणि स्पॅनिश, अमेरिका यांचेबरोबर गुलामाचा व्यापार करावा आणि त्यात जी चांदी मिळेल ती भारताला द्यावी, ह्या दृष्टीने गुलामांच्या विक्रीला फार महत्त्व होते."[१]

राष्ट्रवादी इतिहासकार ब्रिटिशांनी भारताचे शोषण तीन माध्यमातून केले असे म्हणतात. मुख्यतः व्यापार, उद्योगधंदे आणि वित्तीय धोरण यांतून शोषण केले.

"They took note of all the three forms of contemporary economic exploitation, namely, through trade, industry, and finance."[2]

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत भांडवलशाही विकासाच्या औदयोगीक टप्प्याकडे वाटचाल करत होता पण ब्रिटिशाच्या वसाहतीच्या विस्तारवाद त्यास अडसर ठरला. त्याच्या पहिल्या भेटीतच हिंदुस्थानला इंग्रजांचे लढवय्ये म्हणून ओळख झाली. तो हिंदुस्थानात येईपर्यंत इंग्रज हे क्षुल्लक फेरीवाले व्यापारी म्हणून ओळखले जायचे, तर फ्रेंचांना अजिंक्य आणि हुकमत गाजवणारे म्हणून नावाजले जायचे. त्याच्या शौर्याने आणि गुणवत्तेने त्याने आपल्या प्रभावाची दखल घ्यायला लावली. (थॉमस बॅबिंग्टन मेकॉले, लॉर्ड क्लाईव्ह, १८४०)

पोर्तुगीज, डच, इंग्रज, डॅनिश लोकांच्या पाठोपाठ फ्रेंचही हिंदुस्थानात आले. युरोपियनांनी हिंदुस्थान बळकावण्याच्या प्रक्रियेची सुरुवात फ्रेंचांनी केली. १७०७मध्ये औरंगजेब पैगंबरवासी झाल्यावर त्याच्या मुलांमध्ये वारसाहक्कासाठी लढाया सुरू झाल्या. मुघल साम्राज्याचे तुकडे पडायला सुरुवात झाली. मुघलांचे मांडलिक सरदार, त्यांच्यावर कोणाचेच नियंत्रण न राहिल्याने ते स्वायत्त झाले. ते एकमेकांवर कुरघोडी करत. या परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या मराठ्यांना आणि दक्षिण भागातील हिंदूंनाही त्यांना तोंड द्यावे लागत होते. लढणाऱ्या दोन फळयांपैकी एका फळीला आधार देऊन उपकृत करण्याची ही नामी संधी होती. या अशा राजकारणात फ्रेंचांनी बरेच कौशल्य कमावलेले होते.[३] असे फ्रेंच लोकांकडे कौशल्य असले तरी त्यांना मायदेशाकडून नंतर आधार मिळाला नाही आणि ब्रिटीश मात्र पुढे जाऊन येथील राज्यकर्ते बनले.

मुघल सम्राट जहांगीर याने १६१८ मध्ये थॉमस रो याला सवलतींची सनद दिली. रो चे शांततामय व्यापाराचे धोरण पुढे आक्रमक बनले. " उदा. मुंबईच्या गव्हर्नर गेराल्ड याने ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांना १६८७ मध्ये लिहिले की, तुमचा सर्वसाधारण व्यापार हाती तलवार घेऊन तुम्ही करावा ही काळाची गरज आहे."[४]

बंगालमध्ये ब्रिटिशांनी पाय रोवले. प्लासी व बक्सारच्या विजयानंतर ब्रिटिशांनी दिवाणी हक्क मिळविले. यातून ब्रिटिशांनी बंगालची पद्धतशीर लूट सुरु केली. येथूनच ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाची सुरुवात होते.

### वाणिज्यवादी अर्थव्यवस्था (१७५७ ते १८१३):-

भारताशी ब्रिटिशांना सुरुवातीस समान पातळीवर व्यापार करावा लागत असे. सोने, चांदी यांच्या मोबदल्यात वस्तू खरेदी कराव्या लागत. बंगालच्या विजयाने ही स्थिती बदलली बंगालमध्ये ब्रिटीश जो महसूल गोळा करत त्यातूनच ब्रिटिशांचे पगार व भारतीय मालाची खरेदी केली जाऊ लागली. यामुळे व्यापारातून त्यांना प्रचंड नफा मिळू लागला. आपल्या वर्चस्वाखालील प्रदेशांची त्यांनी आता लूट सुरु केली. भारतीय व्यापारी, माल विक्रेते यांचेवर आपल्या किंमती लादल्या. उत्पादन खर्चापेक्षा कमी खर्चात आपला माल विकल्याने भारतीय विक्रेते दरिद्री बनत गेले व ब्रिटिश व्यापारी मात्र श्रीमंत होऊ लागले. अशा पद्धतीने भारताच्या शोषणाची प्रक्रिया सुरु झाली. या काळात व्यापारावर कंपनीचा एकाधिकार होता. तो १८१३ ला संपुष्टात येऊन खुल्या व्यापाराचे तत्त्व भारतात लागू करण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या शोषणाची जाणीव अनेकांना झाली. " ईस्ट इंडिया कंपनी को, पूर्वीय व्यापार पर कंपनी के एकाधिकार को और भारत के राजस्व और निर्यात व्यापार  नियंत्रण के जरिए कंपनी की शोषण पद्धति को ब्रिटीश कारखानेदार अपनी आकांक्षाओ की पूर्ती में प्रमुख बाधा समझते थे |"[५] ब्रिटिशांनी या विरुद्ध एक आंदोलन करून १८१३ मध्ये कंपनीचा व्यापार करण्याचा एकाधिकार संपुष्टात आणला. यानंतर भारतात ब्रिटिशांच्या आर्थिक हितसंबंधाशी निगडीत नवीन काळ सुरु झाला. भारताला उद्योगप्रधान इंग्रजांची वसाहत बनविले गेले. खुला व्यापार लादून त्याचे आणखी तीव्र शोषण सुरु झाले.

### खुल्या व्यापाराची अवस्था (१८१३-१८५८):-

१८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची भारताशी व्यापार करण्याची मक्तेदारी संपली. आता भारत सर्व ब्रिटिश व्यापारी व भांडवलदार यांना व्यापारासाठी खुला झाला. या काळात ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचा विकास जोरावर होता. त्या उद्योगांच्या विकासासाठीही भारताचा वापर केला गेला. यावेळी भारतातील कच्चा माल इंग्लंडला नेला जाऊ लागला  आणि तेथील तयार होणार पक्का माल भारतीय बाजारपेठेत आणून खपविला जाऊ लागला. " उदा. भारतातील कापूस मँचेस्टरच्या कापड गिरण्यांना पुरवला जात असे आणि कापड गिरण्यांमधील तयार कापड भारतात विकले जात असे."[६] इंग्लंडच्या यंत्र उत्पादित मालापुढे भारताचा माल टिकाव धरू शकला नाही. भारतात बाजारपेठा वाढाव्या म्हणून संस्थाने खालसा करण्याचे धोरण राबविले गेले. भारतीय मालावर जकाती लावल्या गेल्या. यामुळे भारतीय उद्योगच नष्ट झाले. कारागीर बेकार झाले. अशा रीतीने या पद्धतीत भारताचे दुहेरी शोषण होऊ लागले. यानंतर आणखी तीव्र शोषणाची आर्थिक साम्राज्यवादाची अवस्था सुरु झाली.

### आर्थिक साम्राज्यवादाची अवस्था (१८५८ पासून पुढे):-

१८५७ चे बंड दडपून टाकल्यावर भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात आणली गेली. इंग्लंडच्या राणीचे राज्य आता भारतावर सुरु झाले. राणीच्या जाहीरनाम्यात अनेक आश्वासने राणीने दिली पण पाळली मात्र नाहीत. कंपनीच्या हातून पार्लमेंटकडे भारताचे वर्चस्व जाणे म्हणजे एका चोराच्या हातून दुसऱ्या मोठ्या, चलाख  चोराच्या हाती भारत जाण्यासारखे होते. त्यांनी भारताचे शोषण कंपनीपेक्षा तीव्रतेने करण्यास सुरुवात केली. १९३३ पर्यंत ब्रिटिशांची भारतात एक अब्ज पौंड गुंतवणूक होती. यावेळी ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचा पहिला टप्पा संपला होता. इंग्लडमध्ये भांडवल गुंतवून नफा कमी मिळत होता. ब्रिटिशांनी अधिक नफ्यासाठी त्यांचे अतिरिक्त भांडवल भारतात गुंतवण्यास सुरुवात केली. भारतात स्पर्धा व मजुरी कमी, कच्चा माल

उपलब्ध यामुळे नफा वाढणार होता. या अवस्थेतून तिहेरी मार्गाने ब्रिटिशांनी भारताचे आर्थिक शोषण सुरु केले. आता या अवस्थेने तर भारताची दुरावास्थाच ओढवली.

### दळवळण साधने :-

रेल्वे बांधण्यास ब्रिटीशांनी भारतात आपल्या व्यापाराच्या फायद्यासाठी सुरुवात केली. जगातील विविध देशांच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासात रेल्वेस फार महत्त्वाचे स्थान आहे. रेल्वे बांधणीसाठी ब्रिटीशांनी भारताचा पैसा वापरला व त्याचा जास्त फायदा मात्र ब्रिटीशांना झाला. दुष्काळात धान्य इतर भागात पोहचवता यावे असे रेल्वे बांधण्यासाठी कारण पुढे करून रेल्वेवर भारताचा प्रचंड खर्च झाला. इतर आधुनिक साधनेही निर्माण केली गेली रेल्वेमुळे भारताचा व्यापार वाढला.

"

| वर्ष | आयात (पौंड) | निर्यात (पौंड) |
|---|---|---|
| 1849-50 | 13,696,696 | 18,283,543 |
| 1855 | 14,770,927 | 20,194,255 |
| 1865 | 50,108,171 | 66,895,884 |
| 1875 | 44,363,160 | 57,984,549 |

"[७]

वरील तक्त्यावरून आपल्या लक्षात येईल की रेल्वेच्या विकासामुळे भारताचा आयात-निर्यात व्यापार किती मोठ्या प्रमाणात वाढला. जेवढा व्यापार वाढला तेवढे भारताचे शोषण वाढले व भारताचा पैसा इंग्लंडला जाऊ लागला.

इ.स.१७५७ ते इ.स.१९४७ या काळात तीन अवस्थांत भारताचे शोषण व ब्रिटनची संपन्नता वाढवणे हे धोरण ब्रिटीशांचे होते. भारताच्या शोषणातून इंग्लंडचे पोषण होऊन तो गब्बर बनत चालला होता. भारत या वसाहतीवरच इंग्लंड मोठ्या प्रमाणावर अवलंबून होता. भारतातील या दरिद्री स्थितीवर सरकार विचार करत नाही म्हणून पुणे सार्वजनिक सभा त्यावर एक विधान टाकते ते बिपन चंद्राच्या पुस्तकात असे आहे. "भारत की घोर दरिद्रता इतनी अधिक उव्देगजनक है कि किसी भी अन्य देश की सरकार इस प्रकार की स्थिती में इस प्रश्न को गंभीरतापूर्वक सोचने को विवश होती, अन्यथा देश में क्रांती हो गई होती."[८]

### महसूल व करपद्धती :-

ब्रिटिशांनी भारताच्या शोषणासाठी राबविलेल्या वेगवेगळया धोरणातील हे एक महत्त्वाचे धोरण होय. जमीन महसूलाच्या कायमधारा, रयतवारी व महालवारी या पद्धती राबवून त्यांनी भारतीय शेतकऱ्यांची पिळवणूक व आर्थिक शोषण केले. रोख महसूल भरण्यासाठी प्रसंगी शेतकऱ्यांना जमिनी विकाव्या लागल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची दैन्यावस्था झाली. शेती हा भारताचा प्रमुख व्यवसाय असल्याने पर्यायाने भारताचे दारिद्र्य यातून ओढवले. कायमधारा पद्धतीत महसूल गोळा करणारा जमीनदार वर्ग उदयास आला. हा वर्ग जनतेचे हाल करत असे. कायमधारा पद्धतीत शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या कराच्या रकमेचा वाटा निश्चित करण्यात आला. " शेतकऱ्याकडून घेण्यात येणाऱ्या खंडाच्या रकमेचा ८९% भाग सरकारला तर ११% भाग जमीनदाराला मिळावा अशी तरतूद करण्यात आली."[९] ही रक्कम ठराविक वेळेतच भरावी लागत असे. कायमधारा पद्धतीमुळे सरकारचे उत्पन्न स्थिर झाले. इ.स. १८२० मध्ये रयतवारी ही महसूल पद्धती थॉमस मनरो याने लागू केली. यात सरकार व

शेतकरी यांचा प्रत्यक्ष संबंध आला. यातही सरकारी अधिकारी जनतेची पिळवणूक करत असत. कठोरपणे कर वसुली केली जाई अन्यथा जमिनी जप्त केल्या जात. या पद्धतीत जप्त जमिनीचे सरकारच मालक बनले. महालवारी पद्धतीत गावाच्या एकूण उत्पन्नाचा अंदाज घेऊन गावासाठी सारा निश्चित केला जात असे. या ब्रिटिशांच्या महसूल पद्धतीने भारतीय कृषीचे स्थैर्य नाहीसे झाले. भारतीय शेतकरी वर्ग ब्रिटिश शोषणाने कर्जबाजारी झाला. शेतकऱ्यांना लुटून प्रचंड संपत्ती ब्रिटिशांनी इंग्लंडला नेली.

## शोषणाबद्दल ब्रिटिशांचे विचार :-

गव्हर्नर रिचर्ड टेंपल याने १८८० मध्ये लिहून ठेवले आहे की, “ इंग्लंडने भारत आपल्या ताब्यात ठेवलाच पाहिजे. कारण येथे ब्रिटिश सत्ता चिरंतन टिकेल या आशावादावर विसंबून ब्रिटिश भांडवल फार मोठ्या प्रमाणावर गुंतवले गेले आहे.” कर्झन ब्रिटिश खान मालकांना कानमंत्र देताना म्हणतो, “ माझी जबाबदारी प्रशासनात आहे, तर तुमची शोषणात आहे; पण एकाच प्रश्नाच्या आणि एकाच कर्तव्याच्या या दोन बाजू आहेत.”[१०]

## भारताचे दारिद्र्य :-

ब्रिटिशांचा भारतातील शासनाचा उद्देश काय होता हे २८ जानेवारी १८८० साली ‘केसरी’ या वृत्तपत्रातील एका लेखात दिले होते. त्या वाक्यांतून हेतू स्पष्ट होतो. “ Surely India is treated as a vast pasture reserved solely for the Europeans to feed upon.”[११] भारतीय संपत्ती शोषून भारताला गरीब कसे बनवले. याची जाणीव अनेक भारतीयांना होऊ लागली व ते आपले विचाराने जागृती करू लागले.लोकहितवादी आपल्या ‘लक्ष्मी ज्ञान’ या पुस्तकातून ब्रिटीश शोषणाचे वर्णन “भारताची संपत्ती दर्यापार चालली” असे करतात. भारताचे दारिद्र्य हे मनुष्यनिर्मित होते आणि ते ब्रिटिशांमुळे आले होते. “ राजाने किंवा त्याचे पिता अगर प्रपितामहाने द्रव्य आणिले नसते. जे राजाजवळ द्रव्य, ते रयतेपासून सर्व घेतलेले असते. याजकरिता त्या द्रव्याचा उपयोग दांडगाईने न करावा. परंतु हे मर्म राजे विसरतात आणि विद्वानही विसरतात.”[१२] अशा पद्धतीने ब्रिटिशांच्या द्रव्य संचयाचे व आर्थिक विषमतेचे वेगळे चित्रण लोकहितवादींनी केले आहे. ब्रिटिशांनी केलेल्या शोषणामुळे संपन्न देशातील गरीब लोक अशी भारताची अवस्था झाली. भारताचे राष्ट्रीय उत्पन्नावरून भारताच्या दारिद्र्यावर प्रकाश पडतो. ती आकडेवारी पुढीलप्रमाणे –“

| अंदाजपत्रक करणारा | सरकारी/बिनसरकारी | ज्या वर्षी केले ते वर्ष | ज्या वर्षाचे केले ते वर्ष | दरडोई वार्षिक उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | रुपये | शिलिंग |
| डी. नवरोजी | बिनसरकारी | १८७६ | १८६८ | २० | ४० |
| बारिंग व बारबौर | सरकारी | १८८२ | १८८१ | २७ | ४५ |
| लॉर्ड कर्झन | सरकारी | १९०१ | १८९७-१८९८ | ३० | ४० |
| डब्ल्यू डिग्बी | बिनसरकारी | १९०२ | १८९९ | १८ | २४ |
| वाडिया व जोशी | - | १९२५ | १९१३-१९१४ | ४४.५ | ५९ |

”[१३]

## दादाभाई नौरोजींचा आर्थिक शोषण सिद्धांत :-

राष्ट्रीय उत्पन्नाची साधने व राष्ट्रीय उत्पन्न यांची दादाभाईंनी चर्चा केली. इ.स. १८७० मध्ये लिहिताना ते म्हणतात, "भारताचे एकूण वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न सुमारे तीस कोटी पौंड व दरडोई उत्पन्न ४० शिलिंग किंवा २० रुपये असल्याचे स्पष्ट केले."[१४] १९ व्या शतकाच्या आरंभी भारतातून ३ लक्ष पौंड इंग्लंडकडे जात होते. ब्रिटिश सरकार लष्करावर अफाट खर्च करत होते. यामुळे हिंदुस्थान मृत्युपंथाला लागला असे म्हटले जाते.

राज्यकारभारावर अफाट खर्च ब्रिटिश करत होते. सल्लागार मंडळ, पार्लमेंट कायदे, सरकारी कामे यावर खर्चाची उधळपट्टी होत होती. मुलकी सेवा व सैन्य यावरील खर्च एकूण राष्ट्रीय खर्चाच्या १/३ होता. युद्धे, न्यायव्यवस्था यांचाही खर्च भारतावर लादला जात असे. प्रशासकीय गैरकारभार व अर्थविषयक चुकीच्या निर्णयांमुळे राष्ट्रीय खर्च व कर्जाचा बोजा वाढत होता. 'ब्रिटिशांनी भारताचे रक्तशोषण चालवले होते' असे दादाभाई म्हणतात.

दादाभाई भारताचे शोषण हे अंतर्गत अर्थव्यवस्था व परदेशी व्यापार या दोन पातळीवर झाले असे म्हणतात. दादाभाईंच्या मते, गझनीच्या महंमदाने १८ स्वाऱ्यांमधून जेवढी लूट नेली, त्या सर्व लुटीपेक्षा अधिक संपत्ती ब्रिटिश लोक दरवर्षी नेत होते. ब्रिटनकडून भारताचे आर्थिक शोषण कसे केले जाते याचे विश्लेषण दादाभाईंनी केले. राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे व देशातील दारिद्र्य कसे नष्ट करता येईल यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यांची कार्यपद्धती वस्तुनिष्ठ व शास्त्रीय पद्धतीवर आधारित होती. राजकीय दास्य आणि आर्थिक दारिद्र्य हे दोन्ही रोग नष्ट करण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम केले. भारताच्या राष्ट्रवादी आंदोलनाला त्यांनी आर्थिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

भारताच्या आर्थिक विपन्नावस्थेसंबंधी आर. सी. दत्त. महादेव गोविंद रानडे, दादाभाई नौरोजी, गोपाल कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यांनी महत्वपूर्ण विचार मांडले. त्यातील दादाभाईंनी आकडेवारीनुसार भारताचे शोषण दाखवून दिले.

लोकमान्य टिळकांनी स्वदेशीचा वापर व परदेशीचा बहिष्कार या माध्यमातून ब्रिटिश साम्राज्यवादाला प्रत्युत्तर दिले. यामुळेच चरख्यातूनही क्रांती घडेल असे गांधीजींना वाटले. या साऱ्या आर्थिक विचार मंथनाला लोकमान्य टिळक व महात्मा गांधींसारख्या नेत्यांनी राजकीय स्वरूप दिले.

### भारताची ब्रिटिशांनी केलेली लूट:-

इ.स. १७९४ ते १८१३ या काळात ८,२६,७५७ पौंड किमतीचे सुती कापड इंग्लंडमधून आयात झाले. इ.स.१८१४-१८१५ या एका वर्षात ३४,४६,०१६ पौंडाची रक्कम भारतातून इंग्लंडमध्ये वाहून नेली. त्यानंतरच्या काळात शोषण वाढतच गेले. उदा. इ.स. १८३६-३७ मध्ये ३०,९०,५८२ पौंड तर इ.स.१८५१ मध्ये ६१,६२,०४३ पौंडाची संपत्ती भारतातून इंग्लंडला नेली गेली. कंपनीच्या अखेरच्या २४ वर्षाच्या काळात एकूण १५,१८,३०,९८९ पौंडाची रक्कम कंपनीने भारतातून उकळली. ब्रिटिशांनी भारतात लोहमार्गात गुंतवलेल्या भांडवलावर हमखास नफ्याची तरतूद म्हणून इ.स. १८४९ ते १८५८ या दहा वर्षाच्या काळात एकूण २२,४४,८२९ पौंडाची रक्कम भारतातील ब्रिटिश शासनाला दिली. ब्रिटिशांनी भारतातून किती संपत्ती लुटून नेली याची मोजदाद करणे तशी अवघड गोष्ट आहे. प्लासी ते वाटर्लु (इ.स. १७५७ ते इ.स. १८५७ ) या काळात ५० ते १०० कोटी पौंडाची संपत्ती भारतातून इंग्लंडला नेण्यात आली. असा अंदाज डिग्बी या राजनीतीज्ञाने व्यक्त केला आहे.[१५]

युरोपीय लेखकांनी ब्रिटिशांचे हे शोषक धोरण कसे योग्य व भारताचे विकासासंदर्भात महत्त्वाचे होते हे पटवून देण्याचा प्रयत्न केला तर भारतीय विचारवंतानी त्या धोरणाने भारत कसा धुळीला मिळाला याची जाणीव भारतीय समाजाला करून देण्याचा प्रयत्न केला.

## समारोप :-

भारताच्या स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेवर / ग्रामीण जीवनावर आघात करून आर्थिक जीवनाची घडी ब्रिटिशांनी विस्कटवून टाकली. ब्रिटिश हे सुरुवातीस याचक होती ते राज्यकर्ते बनून शोषणाची तीव्रता वाढवून त्यांनी भारताला कसे लुटले हे आपण पाहिले. इंग्लंडमधील बदलांबरोबरच भारतातील आर्थिक शोषणाची पद्धत बदलत गेली. यामुळे 'संपन्न देशातील गरीब लोक ' अशी भारताची अवस्था झाली. व्यापार, महसूल वसुली, प्रशासन, औद्योगिक भांडवलशाही यांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारताला लुटले.

भारतातील आजची स्थिती कशी आहे ? एक म्हणजे भारताची संपत्ती ही आज सर्व लोकसंख्येच्या आवाक्यात असलेली मुलभूत समृद्धी व लोकसंख्या आणखी वाढली तरी तिला पुरेशी अशी सोय आज भारतात आहे. दुसरी गोष्ट म्हणजे भारताची गरिबी – आजही बहुसंख्य जनता दरिद्र आहे. ते इतके दारिद्र्यात आहेत की पाश्चात्य व्यक्तीला माहीत असलेल्या दारिद्र्याच्या कल्पनेपलीकडील ती दरिद्रता आहे. ह्या दोन अवस्थांतून आजच्या भारताच्या समस्या निर्माण होत आहेत.

आजही भारताचे वेगवेगळ्या मार्गांनी शोषण अमेरीकेसारखे विकसित देश करत आहेत आहेत. भारतातील बी.पी.ओ., के.पी.ओ., खुला व्यापार तत्त्वाखाली उभे राहिलेले मॉल यांच्या माध्यमातून भारताच्या संपत्तीचे वहनच चालू आहे. आजही जागतिक बँकेच्या कर्जाच्या ओझ्याखाली भारत वावरत आहे. काही भ्रष्ट अधिकारी वर्ग जनतेच्या पैशाचा अपव्यय करत आहेत. अशी ही भारताला शोषणाची एक प्रकारची परंपरा प्राचीन काळापासून लाभलेली दिसते.

या सर्व लोकांमधले अतिशय कष्टप्रद त्रास देऊन शोषण करणारे ब्रिटिश ओळखले जातात. भारताला दारिद्र्य आले ते ब्रिटिशांच्या भारतातील आर्थिक धोरणांमुळे. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाची जाणीव झालेल्या दादाभाई, न्या. रानडे, लोकहितवादी,रोमेशचंद्र दत्त यांनी भारतीयांना ती जाणीव करून दिली.

- शोषणाचा दर = अतिरक्त श्रम / आवश्यक श्रम

या सूत्रानुसार मार्क्सने मांडलेल्या विचारातून भांडवलशाही इंग्लंडने केलेले भारताचे आर्थिक शोषण स्पष्ट होते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, साधन संपत्तीचा संचय असणारा वर्ग समाजातील साधन संपत्ती नसणाऱ्या वर्गाकडून अवास्तव नफा घेतो व त्यांची पिळवणूक करतो, तेंव्हा त्याला आर्थिक शोषण म्हणता येईल. अशाच प्रकारे वेगवेगळे मार्ग वापरून भारताचे शोषण केले गेले व भारताला विपन्नावस्थेत नेऊन टाकले. या ब्रिटिशांमुळे भारताला आजही मोठ्या प्रमाणावर आर्थिक समस्यांच्या सामना करावा लागत आहे आणि तरीही भारत आज आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असा देश बनला आहे.

## तळटिपा :-

१. रजनीपाम दत्त, (अनुवाद : य.ना. देवधर), 'आजकालचा भारत', डायमंड, पुणे, २००६, पृ. ९९-१००.

२. Bipan Chandra, Amales Tripathi, BarunDe, 'Freedom Struggle', National Book Trust, India, 1972, pp. 55,57.
३. रॉय मॉक्झॅम, सरिता आठवले (अनु.) असा लुटला भारत, मेहता पब्लिशिंग हाऊस,प्रथमावृत्ती, २०२३, पुणे,पृ.१५६.
४. डॉ. अरुण जोशी, प्रा. राजा दीक्षित, नीलिमा ठाकूरदेसाई, ' ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत', नाशिक, २००१, पृ.६२.
५. बिपन चंद्र (अनुवाद : श्यामबिहारी राय), ' आधुनिक भारत', एन.सी.ई.आर.टी., नई दिल्ली, २००६, पृ.७२.
६. पूर्वोक्त ६२.
७. डॉ. एम.एस. जैन, 'आधुनिक भारत का इतिहास', मैकमिलन, नई दिल्ली, १९८५, पृ. १९८.
८. बिपन चंद्र, 'भारत में आर्थिक राष्ट्रवाद का उद्भव और विकास', मैकमिलन, नई दिल्ली, १९७७, पृ. १.
९. डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, ' आधुनिक भारताचा इतिहास', श्री साईनाथ, नागपूर, २००१, पृ. २७८.
१०. डॉ. अरुण जोशी, प्रा. राजा दीक्षित, नीलिमा ठाकूरदेसाई, ' ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत', नाशिक, २००१, पृ.६३.
११. Bipan Chandra, Amales Tripathi, BarunDe, 'Freedom Struggle', National Book Trust, India, 1972, p. 58.
१२. कुमार केतकर, 'कथा स्वातंत्र्याची', महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम सं.मं., पुणे, २००२, पृ. ६.
१३. रजनीपाम दत्त, (अनुवाद : य.ना. देवधर), 'आजकालचा भारत', डायमंड, पुणे, २००६, पृ. २८.
१४. स. मा. गर्गे (संपा.), ' भारतीय समाज विज्ञान कोश – खंड १', समाज विज्ञान मंडळ, पुणे, १९८६, पृ. ३२८.
१५. डॉ. अरुण जोशी, प्रा. राजा दीक्षित, नीलिमा ठाकूरदेसाई, ' ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत', नाशिक, २००१, पृ.६८.